वारसाचे महत्त्व समजून घेण्याचे सार

# मृत्युपत्राशिवाय अपूर्ण राहू शकते तुमची मालमत्ता वाटपाची इच्छा

मालमत्तेचा कायदेशीर वारस आणि नॉमिनी यांच्यात काय फरक आहे? नॉमिनी असण्याचा उद्देश काय, नॉमिनीची खरी भूमिका काय? जर मृत्युपत्र बनवले नाही तर त्याचे काय परिणाम होतील? अशा अनेक प्रश्नांची योग्य उत्तरे-योग्य माहिती न घेता, तुमची स्वतःची मालमत्ता ज्याला द्यायची आहे, त्याला मिळण्यात अडथळा निर्माण होऊ शकतो, म्हणून हा विषय योग्य रीतीने समजून त्याची अंमलबजावणी केल्यास अनेक कुटुंबांचे मालमत्तेशी संबंधित वाद टळू शकतात.

आम्ही कायदेशीर वारस आणि नॉमिनी व्यक्तींसह गुंतवणूकदाराच्या मृत्यूनंतर गुंतवणूकदाराच्या नावावर असलेल्या शेअर्सचे अधिकार मिळविण्यासाठी सेबी द्वारे सुलभ केलेल्या प्रक्रियेवर चर्चा केली. तथापि, अनेकांना अजूनही कायदेशीर वारस आणि नॉमिनी यांच्यातील फरकाची पुरेशी समज नाही. हा फरक सोप्या भाषेत समजून घेण्याचा प्रयत्न करूया.

असे प्रश्न प्रत्येक व्यक्तीला आणि कुटुंबाला लागू पडतात की कायदेशीर वारस आणि नॉमिनी एकच आहेत का? गुंतवणुकदाराच्या मृत्यूनंतर नॉमिनीला पैसे मिळणे तर ठीक आहे, पण कायद्याच्या दृष्टीने त्यांच्यात फरक असू शकतो आणि कायद्याच्या दृष्टीने जे योग्य आहे तेच वैध मानले जाईल.

**नॉमिनी एक विश्वस्त किंवा काळजीवाहू**

खरेतर, नॉमिनी व्यक्ती एखाद्या व्यक्तीच्या मालमत्तेचा विश्वस्त (ट्रस्टी) किंवा काळजीवाहू असतो, मालक किंवा वारस नसतो. नॉमिनी हा गुंतवणुकदाराने त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या नातेवाईकांना किंवा प्रियजनांना दिल्या जाणाऱ्या मालमत्तेची काळजी घेण्यासाठी नियुक्त केलेला विश्वासू असतो. पैसे गुंतवणुकदाराच्या कायदेशीर वारसांना वितरित करणे ही त्याची जबाबदारी आहे. गुंतवणुकदाराच्या मृत्यूनंतर नॉमिनी व्यक्तीला भले ही सर्व मालमत्ता मिळाली, तरीही त्याला या मालमत्तेचा विश्वस्त म्हणूनच काम करावे लागते. होय, असे अनेकदा घडते की गुंतवणुकदार त्याच व्यक्ती किंवा व्यक्तींना नॉमिनी करतो ज्यांच्याकडे त्याला त्याच्या मृत्यूनंतर मालमत्ता द्यायची आहे. परंतु अनेकदा, काही कारणांमुळे, किती मालमत्ता द्यायची याचा निर्णय घ्यायचा उर्वरित राहतो, म्हणून प्रथम नॉमिनी व्यक्तीची नियुक्ती होते आणि नॉमिनीला त्याच्या मृत्युपत्रानुसार मालमत्तेचे वाटप होते. मृत्युपत्रात ज्यांची नावे नमूद केली असतात, तेच कायदेशीर वारस असतात.

BSE - INTERNAL

**इच्छापत्र नसल्यास उत्तराधिकाराचा कायदा**

मृत्युपत्र बनवले नसेल तर अशा प्रकरणांमध्ये उत्तराधिकाराचा कायदा लागू होतो आणि त्यानुसार मालमत्तेची वाटणी केली जाते. कारण वारसाहक्क कायद्यात कोणाला किती मालमत्ता मिळते याच्या निश्चित रचनेनुसार काम करावे लागते. जरी एखाद्या व्यक्तीने त्याच्या हयातीत त्याचे मृत्युपत्र केले व अंमलात आणले आणि त्यात त्याची पत्नी आणि मुलांची नावे असली, तर त्या मृत्युपत्रानुसार त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या पत्नी आणि मुलांना मालमत्ता मिळते. त्यावेळी वारसाहक्काचा कायदा चालत नाही. आम्ही आधी चर्चा केल्याप्रमाणे, नॉमिनी कायदेशीर वारस असला तरी, नॉमिनीमध्ये पत्नी आणि मुलांचे पूर्ण नाव, पत्ता, वय आणि नातेसंबंध यांविषयी स्पष्टपणे नमूद केले पाहिजे. नॉमिनी व्यक्ती अल्पवयीन असल्यास, त्याच्यासाठी मेजर व्यक्तीची नियुक्ती केली जाऊ शकते.

**नॉमिनीची नियुक्ती करण्याचे फायदे काय आहेत?**

जर नॉमिनी संबंधित मालमत्तेचा मालक नसेल तर त्याची नेमणूक का करावी? याचे उत्तर असे आहे की, प्रत्येक गुंतवणूकदाराची इच्छा असते की त्याच्या मृत्यूनंतर त्याचे शेअर्स, म्युच्युअल फंड योजनांचे पैसे, विम्याची रक्कम इत्यादी कंपन्यांकडे राहण्याऐवजी तो अशा व्यक्तीला नॉमिनी म्हणून ठेवतो ज्यावर त्याचा पूर्ण विश्वास असतो, जेणेकरून ती नॉमिनी व्यक्ती त्या व्यक्तींना कायदेशीर वारसांचे अधिकार सुव्यवस्थितपणे मिळवून देईल. अन्यथा, गुंतवणुकदाराच्या मृत्यूनंतर, कायदेशीर वारसांना विविध कंपन्या आणि संस्थांशी व्यवहार करण्याची वेळ येते, ज्यामध्ये मृत व्यक्तीचे मृत्यूचे प्रमाणपत्र, नातेसंबंधाचा पुरावा, इत्यादी अशा प्रदीर्घ प्रक्रियेतून जावे लागते. परंतु जर नॉमिनी असेल, तर या कंपन्यांना मालमत्ता थेट नॉमिनीला हस्तांतरित करावी लागेल, कंपन्या तसे करण्यास बांधील असतील, तर प्रकरण हे नॉमिनी आणि मृत गुंतवणूकदाराच्या कायदेशीर वारसांमध्ये राहते. अर्थात, या प्रकरणात तुम्ही तुमच्या कायदेशीर-आर्थिक सल्लागाराचाही सल्ला घ्यावा.

BSE - INTERNAL